माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वयेदाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००८८३**

**अपिलार्थी श्री. उमाशंकर कश्यप**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी**
महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, रुग्णालय इमारत
०१ ला मजला, गणपत जाधव मार्ग, वरळी,
मुंबई -४०० ०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, रुग्णालय इमारत
०१ ला मजला, गणपत जाधव मार्ग, वरळी,
मुंबई -४०० ०१८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २२.०७.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्ट नुसार दि. ११.०७.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्ट नुसार दि. ११.०७.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे)

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.१२.२०२२ | - | १५.०२.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २२.०३.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. १५.०६.२०१५ रोजी बडतर्फ केल्यानंतर देय ग्रॅज्युटी रक्कमेचे विवरण पत्राची प्रतची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. १५.०२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

..२/-

पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ११.०८.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

प्रदीप व्यास 23-7-2025

**मुंबई**
**दिनांक : २३.०७.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००८८३**
**अपिलार्थी श्री. उमाशंकर कश्यप**

**सुनावणी दिनांक : ११.०८.२०२५ (In continuation of order dt २३.०७.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांसह उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असूनजन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ११.०८.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अर्जदार श्री. कश्यप यांचे माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि.३०.१२.२०२२ रोजीचा अर्ज पोस्टाद्वारे या कार्यालयास दि. ०६.०२.२०२३ रोजी प्राप्त झाले. सदर अर्जामध्ये त्यांनी त्यांना बडतर्फ केल्यानंतर देय असलेली ग्रेज्युटी रक्कमेचे विवरण पत्राची प्रत मागितली होती. सदर माहिती ही या कार्यालय अंतर्गत वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय, रा.का.वि.यो. रुग्णालय, ठाणे यांच्या संबंधीत असल्याने दि. १६.०२.२०२३ रोजी पत्रान्वये ठाणे रुग्णालय यांना अर्ज हस्तांतरीत करुन तसे अर्जदारास कळविण्यात आले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी, रा.का.वि.यो. रुग्णालय, ठाणे यांनी दि. १७.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार श्री. कश्यप यांना माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये दि. ०३.०३.२०२३ रोजीचा पत्र समाविष्ठ असून, त्यामध्ये श्री. कश्यप यांना बडतर्फ केले असल्याने, म.ना.से. निवृत्तीवेतन नियम १९८२ मधील नियम ४५ अनुसार पुर्वीच्या सेवेचा हक्क गमावतात. परिणामी त्यांना निवृत्तीवेतन व उपदान (ग्रेज्युटी) अनुज्ञेय ठरत नाही. असे नमूद केलेले आहे. यासंदर्भात प्रथम अपिल केले असल्याचे या कार्यालयातील अभिलेख्यात दिसून येत नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 12-8-2025

**मुंबई**
**दिनांक : १२.०८.२०२५**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**